**<u>नियमित दिवाणी मुकदमा कमांक १२५/२०१२ मधील</u>**
**<u>नि.८८ वरील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे मयत प्रतिवादी नं.३ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जातील कथनाप्रमाणे, प्रतिवादी नं.३ ता. १२/०९/२०१६ रोजी मयत झाले आहेत. त्यांना आर्जत नमूद केलेले वारस आहेत. वादीला मयत प्रतिवादी नं.३ च्या वारसांची नावे आणि पत्ते माहिती नव्हते. त्याची माहिती प्राप्त होण्याकरिता ता. १९/०९/२०१६ रोजी त्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला होता. प्रतिवादी नं.३ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी केवळ एक दिवसाचा विलंब झाला आहे. त्यामुळे सदरचा विलंब माफ करण्याची तोंडी विनंती करुन अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे.

३. प्रतिवादींतर्फे या अर्जावर म्हणणे दाखल करुन योग्य तो आदेश करण्याची विनंती केली.

४. वादीतर्फे वकिलानी असा युक्तिवाद केला की, केवळ एक दिवसाचा विलंब करण्यासाठी विलंब माफीचा किंवा अबेटमेंट सेटअसाईडचा अर्ज दाखल करण्याची आवश्यकता नाही. सदरचा एक दिवसाचा विलंब हा सबळ कारणामुळे झालेला असून तो माफ करण्यात यावा. याअनुषंगाने त्यांनी ***<u>मिथाईलाल दल्सनगर सिंग आणि इतर विरुध्द अण्णाबाई देवराम किनी आणि इतर, प्रकशित २००३(४)एम.एच.एल.जे. पान नं.७२१</u>*** या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली आहे. त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे वारस रेकॉर्डवर घेण्याचा अर्ज अबेटमेंट सेटसाईडच्या अर्जाशिवाय दाखल केल्यास न्यायालयाने ते उदार मताने विचारात घेतले पाहिजे.

५. वादीने याकामी मयत प्रतिवादी नं.३ चे मृत्यूप्रमाणपत्र (नि.

९५) दाखल केले आहे. त्याप्रमाणे प्रतिवादी नं.३ दिनांक १२/०९/२०१६ रोजी मयत झाले आहेत. प्रस्तुतचा अर्ज ता. १३/१२/२०१६ रोजी दाखल केलेला आहे. या कामी प्रतिवादी नं.३ ची मृत्यूची तारीख वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी वगळणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांचे वारस अभिलेखावर घ ेण्याची मुदत १३/०९/२०१६ पासून सुरु होते व १३/१२/२०१६ रोजी संपुष्टात येते. तद्नंतर एक दिवसाच्या विलंबाने हा अर्ज दाखल केला आहे.

६. परंतु, अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी नं.३ च्या वारसांची नावे आणि पत्ते माहिती करण्यासाठी वादीतर्फे न्यायालयात अर्ज दाखल केला होता. त्यामुळे वादीला प्रतिवादी नं. ३ मयत झाल्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्वरीत कारवाई केली आहे. जरी अर्जासोबत वादीने अबेटमेंट सेटसाईडसाठी आणि विलंब माफीसाठी अर्ज दाखल केला नसला तरी वादीतर्फे वकिलांनी भिस्त ठेवलेल्या न्यायनिणर्याचा मतितार्थ पाहता झालेला विलंब उदार मताने विचारात घेणे आवयश्यक आहे. सदर एक दिवसाचा विलंब हा वादीने जाणीवपूर्वक किंवा प्रकरण लांबविण्यासाठी केलेला नाही. प्रस्तुत प्रकरण ५ वर्षापेक्षा जास्त जुने आहे. त्यामुळे वादीला पुन्हा आदेश देवून नवीन अर्ज दाखल करायला सांगून वेळेचा अपव्यय करण्याऐवजी उदार मताने अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादीला कोणतीही हानी होणार नाही. करिता आदेश-

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर.

२. मयत प्रतिवादी क्र.३ यांचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येते.

३. वादी यांनी अर्जात सुचवलेली दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत दाखल करावी. दावा दुरुस्तीनंतर मयत प्रतिवादी क्र.३ चे वारसांना दावा समन्स काढण्यात यावे.

सही/-
( श्र.जि. डोलारे )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कर्जत
जि.रायगड.

कर्जत
दिनांक : २९/०१/२०१८